# २० व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारक

# घटक २ : शैक्षणिक सुधारक

# ३) डॉ पंजाबराव देशमुख

**प्रास्ताविक**

२७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावतीजवळ पापळ या गावी पंजाबराव देशमुख यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ आडनाव कदम परंतु घराण्यात असलेल्या देश्मुखीमुळे देशमुख आडनाव रूढ झाले. त्यांच्या वडिलांचे नाव शामराव तर आईचे नाव राधाबाई होते. आई वडील शेती करायचे. किराणा दुकान व दुधाचा जोड व्यवसाय ही ते करत. पंजाबराव हुशार होते लहानपणापासून त्यांना शिक्षणाची प्रचंड आवड होती .ते पापळ येथे तिसरी पर्यंत व कारंजा लाड येथे सातवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी घेतले. पुढे अमरावतीच्या हिंदू हायस्कुल मध्ये प्रवेश घेतला. १९१८ मध्ये ते मॅट्रिक चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले त्यांना त्यामुळे सरकारची शिष्यवृत्ती मिळाली. महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये आले. तेथे वऱ्हाड भागातील विद्यार्थ्यांचा सी.पी. अॅन्ड बेरार कल्ब हा क्लब स्थापन केला. त्यांना खेळ व कलांचीही आवड होती. त्यांचे वाचन मोठे होते. पुढे स्वत:ची जमीन गहाण ठेऊन त्यांनी इंग्लंड येथे उच्च शिक्षण (डॉक्टरेट) पूर्ण केले. वैदिक वाङ्मयातील धर्माचा उद्गम व विकास याविषयावर त्यांनी पीएचडी मिळविली. विदेशात वेदावर पीएचमिळवणा .डी.रे ते पहिले भारतीय आहेत. तसेच आर्थिक अडचणीतून मार्ग काढत बॅरिस्टर होऊन ते भारतात परतले. त्यांनी आपला व्यवसाय सुरू केला. त्यांनी लढविलेली व यश मिळविलेली सत्यशोधक जलसा वादाची फौजदारी केस त्याकाळात फार गाजली होती. या केसमुळे पंजाबराव देशमुखांना खूप प्रसिद्धी मिळाली. कोर्टात काम करतानाच आपण शिक्षण घेतलेली शाळा श्री शिवाजी मराठा हायस्कूल (तट्टा हायस्कूल) अडचणीत असल्याने तेथे मोफत शिकविण्याचेही काम करत. पुढे त्यांनी राजकारणासह विविध क्षेत्रात फार मोलाचे काम केले. दरम्यान १९२७ मध्ये त्यांचा ठरवून आंतरजातीय विवाह झाला. त्यांच्या पत्नीचे नाव विमल होते. पंजाबराव देशमुख यांचे शिक्षण क्षेत्रातील काम फार महत्त्वाचे आहे. गरीबांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यास प्रयत्न करणाऱ्या सुधारकामध्ये पंजाबराव देशमुख हे एक महत्त्वाचे सुधारक आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांच्या प्रभावातून त्यांनी कार्य केले. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानामुळे ते शिक्षणमहर्षी म्हणून ओळखले जातात. पंजाबराव देशमुख यांचे कार्य पुढीलप्रमाणे...

**१) स्वामी श्रद्धानंद वसतिगृह (छात्रालय) स्थापना**

आपला व्यवसाय करतानाच पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कामही सुरु होते. समाज सुधारणेत शिक्षण महत्त्वाचे ठरते व शिक्षण प्रसारात प्रामुख्याने विद्यार्थ्यांना निवासाची मोठी अडचण असते. त्यामुळे गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह असावे या विचारातून पंजाबराव यांनी अमरावतीत स्वामी श्रद्धानंद यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वसतिगृह सुरु केले. ही पंजाबराव देशमुख यांनी सुरु केलेली पहिली संस्था होती. हे वसतिगृह सर्व जातींच्या विद्यार्थ्यांसाठी खुले होते. सुरुवातीस यात केवळ सात विद्यार्थी होते. पुढे ही संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. खेडोपाडी सायकलवर फिरून त्यांनी या वसतिगृहासाठी मदत (धान्य व पैसा) मिळविली. मुष्टीफंड मिळवून वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मोफत जेवणाची सोय केली. विद्यार्थ्यांना निवासी सुविधेसह शिक्षण उपलब्ध झाले पाहिजे म्हणून त्यांनी आपल्या शिक्षण संस्थेच्या शाळांना जोडूनच वसतिगृहे (छात्रालय) सुरु केली. पुढे देशमुख यांच्या मार्गदर्शनात काळाची गरज ओळखत छत्रपती शिवाजी एज्युकेशन ट्रस्ट ची स्थापना करून त्यांच्या संस्थेने लंडन येथेही भारतीय विद्यार्थ्यांच्या मोफत शिक्षणासाठी आपले वसतिगृह सुरु केले.

**२) श्री शिवाजी व्यायाम प्रसारक मंडळ**

इंग्रजकाळात शारीरिक शिक्षण व मल्लविद्या दुर्लक्षित झाली होती. त्याचे महत्त्व जाणून काही संस्था यासाठी काम करत होत्या. १९१४ मध्ये अमरावतीत वैद्य व मोहोड यांची सुरु झालेली हनुमान व्यायाम शाळा प्रसिध्द आहे. परंतु वैद्य व मोहोड यातील मतभेदामुळे स्वतंत्र व्यायामशाळा सुरु करण्याचा विचार पुढे आला. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाला संघटीत व सामर्थ्यशाली करणे आवश्यक असून त्यासाठी तरुणांना बलवान बनविणे आवश्यक आहे असे भाऊसाहेबांचे ही मत होते. पंजाबराव देशमुख यांनाही आरोग्य व व्यायामचे महत्त्व माहित होते व त्यांना याबाबत आवडही होती. त्यामुळे पंजाबराव यांनी यात लक्ष घातले व १९२६ मध्ये दसऱ्याच्या दिवशी श्री शिवाजी व्यायाम प्रसारक मंडळ ही संस्था सुरु केली. या व्यायाम शाळेचे उन्हाळी वर्ग अनेक ठिकाणी सुरू झाले व संस्थेच्या शाखा अमरावती जिल्ह्यात सर्वत्र सुरु झाल्या. या संस्थेत सर्व जाती धर्माच्या लोकांना प्रवेश होता. तरुणांना शिस्त व चारित्र्याचे धडे देऊन त्यांच्याठायी राष्ट्रप्रेम वाढविणे हा त्यांचा उद्देश होता. पुढे उदयास आलेल्या शारीरिक शिक्षण चळवळीस या कार्यातून प्रेरणा मिळाली. १९३२ मध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेने त्यांच्या प्रत्येक शाळेत एक श्री शिवाजी व्यायाम शाळा सुरु करून

तरूणांना बौद्धिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षण उपलब्ध करून दिले. तसेच त्यांनी त्यांच्या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम चालविले.

**३) जिल्हा कौन्सिलमध्ये कार्य अध्यक्षपद ( १९२८-३० )**

१९२८ ते १९३० याकाळात डॉ पंजाबराव देशमुख निवडणूक जिंकून जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष बनले. आपल्या कार्यकाळात त्यांनी पिण्याच्या पाण्यासह अनेक प्रश्न सोडविले. त्यात शिक्षण विषयक कार्याचाही समावेश आहे. सक्तीच्या शिक्षण योजनेचा आराखडा त्यांनी कौन्सिलच्या बैठकीत मांडला होता. या योजनेसाठी जिल्हा कौन्सिलचा सेस १८ पैशावरून २७ पैसा केला. त्या पैशातून जिल्हात १०० शिक्षणाची केंद्रे उघडली ज्यात गोरगरिबांची मुले शिकू लागली.

**४) श्री शिवाजी शिक्षण संस्था (१ जुलै १९३२)**

राजर्षी शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेत खामगाव येथे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अधिवेशन सुरु होते. यास हजारो लोक उपस्थित होते. वऱ्हाडात शिक्षण प्रसारासाठी राजर्षी महाराजांच्या आर्थिक मदतीतून विदर्भ मराठा शिक्षण मंडळ संस्था सुरु झाली. ही संस्था आर्थिक अडचणींमुळे चालविणे अशक्य झाले. यावेळी वऱ्हाड प्रांताचे शिक्षण मंत्री डॉ पंजाबराव देशमुख होते. त्यांनी याशाळेस निधी मिळवून दिला पण तो निधी संपल्यावर शाळा पुन्हा बंद होण्याच्या स्थितीत आली. शाळा बंद होणे त्यांना आवडणारे नव्हते. अखेर त्यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था स्थापन केली. या संस्थेला लवकरच मान्यता व अनुदानही उपलब्ध झाले. या संस्थेने अडचणीत असलेले श्री शिवाजी हायस्कूल श्री शिवाजी शिक्षण संस्थेने १ ऑगस्ट १९३२ रोजी दत्तक (चालवायला) घेतले. पंजाबराव देशमुख यांनी अमरावतीत सुरु केलेल्या या श्री शिवाजी शिक्षण संस्थेमुळे त्या भागात शैक्षणिक क्रांती घडून आली. या संस्थेच्या निधी जमविण्यास पंजाबराव देशमुख यांना फार कष्ट करावे लागले. प्रसंगी त्यांनी स्वत:चा बंगला गहाण ठेवत कर्ज काढून संस्था वाचविली. सरकारकडून या संस्थेसाठी त्यांनी जमीन मिळविली. खेड्यापाड्यातून धान्य मिळविले. राजर्षी शाहू महाराज या संस्थेचे आश्रयदाते होते. श्री दादासाहेब बोके, श्री बाबासाहेब सांगळूदकर यांनीही संस्थेला मोलाची आर्थिक मदत दिली. हैद्राबाद निजाम व ग्वाल्हेरचे राजे जिवाजीराव शिंदे यांनीही संस्थेस आर्थिक मदत दिली.

या संस्थेच्यावतीने माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळा चालविल्या जाऊ लागल्या. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या नवीन घटनेप्रमाणे डॉ पंजाबराव देशमुख यांचे योगदान लक्षात

घेऊन १४ मार्च १९३७ रोजी त्यांना आजीव अध्यक्षपद देऊ केले. वऱ्हाडातील अनेक अडचणीतील शाळा या संस्थेने चालविण्यास घेतल्या.

१९४५ नंतर उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये सुरु करण्यात आली. अमरावतीचे श्री शिवाजी महाविद्यालय १९४६ मध्ये सुरु झाले. डॉ ज्वालाप्रसाद या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य होते. या महाविद्यालयात पुढे अनेक शाखा व पदव्युत्तर अभ्यासक्रमही सुरु करण्यात आले तसेच पुढे विदर्भात या संस्थेची अनेक महाविद्यालये सुरु झाली. आज ही संस्था महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी शिक्षण संस्था आहे. २६९ पेक्षा अधिक शाळा महाविद्यालयातून या संस्थेचे शिक्षण प्रसाराचे कार्य सुरु आहे. शिक्षणातून क्रांतीसाठी १९५६ मध्ये रूरल इन्स्टिट्यूटची स्थापना केली. त्या माध्यमातून स्वतंत्र तंत्रनिकेतन, ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स व व्होकेशनल, कृषिविज्ञान पदविका, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, पंचायत राज केंद्र, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, अंगणवाडी सेविका केंद्र अशी विविध केंद्रे सुरू केली. १९३२ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेने १९६५ पर्यंत डॉ पंजाबराव देशमुखांच्या नेतृत्वात नेत्रदीपक कार्य केले. विदर्भालाच नव्हेतर देशाला नेतृत्व करणारी मंडळी दिली. वैदर्भिय समाजाला वैचारिक परिवर्तनाकडे वळवत प्रदेश व समाजाचा संपूर्ण कायापालट घडवून नवा आदर्श घालून दिला.

**५) श्री शिवाजी लोक विद्यापीठ**

पंजाबरावांनी समाजसेवक व देशभक्त घडविण्यासाठी विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी स्थापन केलेल्या विद्यापीठाचे उद्घाटन ३० सप्टेबर १९५० रोजी राष्ट्रपती डॉ राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते झाले. श्री शिवाजी लोक विद्यापीठ अभिनव व सर्वांगपूर्ण योजना होती. हा धाडसी प्रयत्न होता. पारंपरिक मार्गापेक्षा वेगळा धाडसी प्रयत्न होता. खरेतर लोकशिक्षणाची क्रांतिकारी योजना होती. विद्यापीठ सुरु करताना डॉ पंजाबराव देशमुख म्हणाले होते, अत्यंत उच्च श्रेणीच्या विद्वानांची मालिका आपल्या देशात नेहमीच तयार होत आली आहे. पण त्यामुळे कोट्यावधी देशवासियांची शैक्षणिक किंवा बौद्धीक पातळी मात्र उंचावली नाही. इतर विद्यापीठांना 'महामानव' निर्माण करण्याकरिता सर्वशक्ती व पैसा वेचू द्या, माझे विद्यापीठ मात्र अज्ञान, दारिद्र्य, कुचंबना व घृणास्पद अवस्था यांच्या काळ्याकुट्ट अंधःकारात चाचपडत पडलेल्या कोट्यावधी स्त्री-पुरूषांमधून समाज सेवक व देशभक्त निर्माण करण्याकरिता झटत राहील. कला, साहित्य, विज्ञान, हस्तव्यवसाय व संस्कृतीचे सखोल अध्ययन करण्यास सोई व सवलती उपलब्ध करणे, शिक्षण चौकटीतून बाहेर

फेकले गेलेल्या बुद्धिमान व कल्पक लोकांना शिक्षण संशोधनाची संधी देणे, बहुजनात शिक्षण ओढ निर्माण करणे, अभ्यासाच्या दुर्मिळ सोई देत तसे अभ्यासक्रम आखणे, बालोद्याने, माँटेसरी, प्राथमिक, पूर्व प्राथमिक शाळा, जनता शाळा सुरु करणे, शेतकरी व कामकरी लोकांना शिक्षण प्रशिक्षण घेता येईल अशा संस्था निर्माण करणे, ग्रामीण भागात विविध विषयांचे ज्ञान देणारी जनता महाविद्यालये उभारणे, या उद्देशानुरूप काम करणाऱ्या संस्थांना आर्थिक मदत देणे, जाती जातीत सामंजस्याची जाणीव वाढविणे, विज्ञानसंस्था स्थापन करणे अशी या विद्यापीठाची उद्दिष्टे होती.

**६) जनता कॉलेज (१९५१)**

अत्यंत व्यापक क्रांतिकारी विचारातून श्री शिवाजी लोक विद्यापीठ सुरु झाले. त्यानंतर अल्पावधीत १६ सप्टेबर १९५१ रोजी जनता कॉलेज सुरु करण्यात आले. तसेच अनेक उपक्रम व शाळा या उद्दिष्टानुसार सुरु होऊन त्याचा लाभ सर्वसामान्यापर्यंत पोहोचला. ग्रामीण भागातील मुलांसाठी सामान्य शिक्षणाबरोबर तंत्रशिक्षण, वैद्यकीय सारखे शिक्षण संधी ही उपलब्ध झाल्या. युनेस्को चे भारतातील सल्लागार डॉ हॅच यांच्या सूचनेनुसार दिल्लीजवळ अलीपूर येथे प्रौढांना व्यावसायिक शिक्षण देणारे जनता कॉलेज सुरु झाले होते. भाऊसाहेबांनी अलीपुरचे हे कॉलेज पाहिले व श्री शिवाजी लोक विद्यापीठामार्फत अमरावतीला जनता कॉलेज सुरु करण्याबाबत निर्णय घेऊन त्यावर तत्काळ कार्यवाही केली. सुरवातीस १८ ते ३० वयोगटातील ग्रामीण प्रौढांसाठी शिक्षणाची व्यवस्था केली. पुढे यात अधिक वयाच्या व वेगवेगळ्या अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला.

**७) रूरल इन्स्टिट्यूट (१९५६)**

स्वातंत्र्यानंतर डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेत सुधारणांसाठी स्थापन केलेल्या विद्यापीठ आयोगाचा अहवाल १९४९ मध्ये प्रसिद्ध झाला. यात शिक्षण जनताभिमुख होण्यासाठी लोकशिक्षणावर भर द्यावा असे सांगितले होते. त्यानुसार सरकारने डॉ श्रीमाळी समिती नेमून ग्रामीण शिक्षण योजनांचा आढावा घेतला. त्यात भारतात १० ग्रामीण महाविद्यालये स्थापन करण्याचे सुचविले होते. सरकारने स्वतंत्र समिती नेमून ग्रामीण शिक्षणात काम करणाऱ्या संस्थांची माहितीही घेतली. त्या समितीच्या निर्णयानुसार श्री शिवाजी शिक्षण संस्थेस रूरल इन्स्टिट्यूट चालविण्याची जबाबदारी देण्याची आली व ९ जुलै १९५६ रोजी अमरावतीला श्री शिवाजी लोक विद्यापीठाच्या अखत्यारीत रूरल इन्स्टिट्यूट सुरू झाली. या इन्स्टिट्यूटचे पहिले प्राचार्य श रा लोढे होते. तर या इन्स्टिट्यूटचे मॉडेल गाव

रहाटगाव होते. पहिल्याच वर्षी १०६ विद्यार्थी या इन्स्टिट्यूटमध्ये आले. पुढे या संस्थेतील विद्यार्थी व अभ्यासक्रम गरजेनुसार वाढतच गेले. भाऊसाहेबांनी आंतरिक जिव्हाळ्याने जोपासलेले बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीचे रोपटे या रूरल इनस्टिट्यूटच्या रूपाने विशाल वटवृक्षात रूपांतरीत झाले.

**८) स्त्री शिक्षण**

बंधनांमुळे स्त्री मागे राहिली होती. महाराष्ट्रात राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, महर्षी कर्वे या महापुरुषांनी स्त्री उद्धारासाठी मोलाचे कार्य केले. स्त्री उद्धारात शिक्षणाचा अभाव हे मोठे कारण होते. त्यामुळे म.फुले व कर्वे यांनी स्त्री शिक्षणासाठी परिश्रम घेतले. विदर्भ शैक्षणिकदृष्ट्या अधिकच मागासलेला होता. स्त्री शिक्षणाची स्थितीतर अधिकच चिंताजनक होती.१८४९ मध्ये नागपूरला १८६८ मध्ये अकोला येहते मुलींची शाळा व १८९४ अमरावतीस मुलींसाठी कॅथॉलिक मिशन स्कूल सुरु झाले होते. पण विदर्भात मुलींच्या शिक्षणाचा फार प्रसार झालेला नव्हता. स्त्री साक्षरतेचे प्रमाण दर हजारी १७ इतके कमी होते. १८९३ मध्ये स्थापन झालेला स्त्रियांचा 'वनिता समाज' स्त्री साक्षरतेसाठी कार्य करत होता. या प्रदेशात व स्त्री शिक्षण प्रसाराचे बहुमोल कार्य डॉ पंजाबराव देशमुख यांनी केले.

भाऊसाहेबांनी स्त्री शिक्षणाचा प्रारंभ घरातून केला. त्यांच्या पत्नी सौ विमलबाई मॅट्रिक होत्या. त्यांच्या उच्च शिक्षणाकडे भाऊसाहेबांनी स्वत: व प्रोत्साहन दिले. त्यामुळे सौ विमलबाई बीए व पुढे एलएलबी झाल्या. वऱ्हाडातील त्या पहिल्या महिला वकील होत्या. डॉ पंजाबराव देशमुख यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. स्त्रियांच्या स्वावलंबनासाठी शिक्षण महत्त्वाचे मानले. व्यावहारिक व कौशल्यावर आधारित तसेच स्त्रियांना उपयुक्त ठरणारे अभ्यासक्रम तयार केले. ग्रामीण भागात गरिबांपर्यंत शिक्षण पोहचविताना आपल्या संस्थेच्या अनेक शाळा सुरु करताना स्त्रियांसाठीही शाळा सुरु करत स्त्री शिक्षणाकडेही लक्ष दिले. वरुड येथे पार्वतीबाई धर्माधिकारी कन्या शाळा सुरू केली. अमरावती येथे कस्तुरबा कन्या शाळा व श्रद्धानंद वसतिगृह सुरु केले. सत्तरच्या दशकात श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अनेक शाळा सुरु झाल्या. त्यात दर्यापूर व चांदूर रेल्वे येथे कन्याशाळा सुरु केल्या. १९६१ मध्ये नागपूर येथे जवाहर कन्या शाळा सुरु झाली. अमरावती व वर्धा जिल्हयात मुलींच्या अनेक माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये सुरु झाली.चांदूर रेल्वे व आंजी (वर्धा) येथे मुलींचे कनिष्ठ महाविद्यालय आहे. मुलींच्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात हजारो मुली शिक्षण घेत आहेत.

**९) इतर कार्य**

शिक्षण प्रसारचे डॉ पंजाबराव देशमुख यांचे कार्य अत्यंत मोलाचे आहे. इतर क्षेत्रातील त्यांचे सुधारणा कार्य ही महत्त्वाचेच आहे. मंदिर प्रवेश सत्याग्रहात (अमरावती अंबादेवी मंदिर सत्याग्रह) त्यांचा सहभाग होता. तयंनी स्वत: ठरवून आंतरजातीय विवाह केला होता. जातीभेद दूर करण्यास त्यांनी विविध उपाय योजले व त्या कार्यात भागही घेतला. घटना समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. शेती व शेतकऱ्यांसाठी त्यांनी विशेष कार्य केले आहे. शेतकी संघ स्थापन केला. त्यातून शेतकरी प्रश्न मांडले व सोडविले. पुढे ३ वेळा खासदार म्हणून संसदेत काम केले. याकाळात त्यांनी १० वर्ष कृषीमंत्री पद ही भूषविले.शेतकी संशोधनास चालना दिली. संशोधन शेतकर्यापर्यंत पोहोचविण्याचे काम केले. पुढे भारत कृषक समाज माध्यमातून काम केले.

**समारोप**

**शेतीला जसे पाणी तसे समाजाला शिक्षण** आवश्यक असल्याची पंजाबराव देशमुख यांची भूमिका होती. त्यानुसार दुर्गम, ग्रामीण, गरजू भागातही शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. त्यांच्या कार्याबद्दल वीर उत्तमराव मोहिते आपल्या ग्रंथात म्हणतात, “डॉ. पंजाबराव देशमुख म्हणजे ग्रामीण समाजाचा ज्ञानकोश आणि संदर्भग्रंथ ठरतो..व्यक्तिमत्त्व, वक्तृत्व, क्रौर्य, सामाजिक दानत, समाजकार्याबद्दलची आस्था, प्रशासन कौशल्य, संघटक नैपुण्य, कायद्याला समाजोपयोगी बनविण्याचे सामर्थ्य हे सारे गुण पंजाबरावांजवळ होते. कृषकांचे दारिद्र्य व अज्ञान दूर करून भारताचा सार्वांगीण विकास साधण्याचे त्यांचे ध्येय होते.” पंजाबराव यांनी केलेल्या शिक्षण उद्देश केवळ साक्षरता वाढविण्याचा नव्हता तर ग्रामीण तळागाळातील माणसाला स्वावलंबी बनवण्याचा होता. त्यांच्या शिक्षण प्रसारातील व्यापक कार्यामुळेच त्यांना 'शिक्षणमहर्षी' म्हणून गौरविले जाते. देशमुखांच्या कार्यामुळे सक्तीचे, विनाशुल्क व सार्वत्रिक  शिक्षण सुरू करण्यात अमरावती जिल्ह्याने संपूर्ण भारतामधून दुसरा क्रमांक पटकावला होता.  डॉ. पंजाबराव देशमुख यांनी मागे राहिलेल्या समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी मोठे कार्य केले. त्यासाठी वसतिगृहयुक्त शिक्षण  व विविध प्रकारच्या शाळा महाविद्यालयाची स्थापना केली. त्यांच्या कार्यामुळेच समाजास उन्नतीच्या संधी मिळाल्या. डॉक कार्य क्रांतिकापंजाबराव देशमुख यांचे शैक्षणि.री आहे. संपूर्ण देशासाठी त्यांचे कार्य दिशादर्शक ठरले. नागपूर विद्यापीठाने एलपदवी .डी.एल. देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. १७ एप्रिल १९६५ रोजी पंजाबराव देशमुख यांचा मृत्यू झाला.